CIDCO
WE MAKE CITIES

प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

सिडको
शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-5650 0900; Fax: 91-22-5650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ninawe.mb@cidcoindia.com

दि. ६–०६–२००९

# विचार आणि कृतीतून सामाजिक क्रांतीला चालना मिळते – श्री.उत्तम खोब्रागडे

'आपले प्रश्न व समस्या विचारांचे आदान–प्रदान करून सोडविल्या तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेली विश्वबंधुत्वाची शिकवण खऱ्या अर्थाने अमलात आणता येईल. याकरिता समाजाने एकत्रित वैचारिक कृतीने काम करून व्यक्तिस्वातंत्र्य, धर्मनिरपेक्षता आणि समता याबाबत समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याची जबाबदारी प्रत्येकावर आहे. विचार व कृतीतूनच सामाजिक क्रांती होत असल्याने समतेचा लढा सतत सुरू ठेवण्याचा उद्‌देश प्रत्येकाने बाळगावा,' असे प्रतिपादन श्री. उत्तम खोब्रागडे यांनी कोकण भवन आणि सिडको भवन यांच्या संयुक्त विद्यमाने सिडको भवन येथे दिनांक १३ मे, २००९ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या ११८व्या जयंती सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. **श्री. स. भा. मोहिते,** सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक **श्री. जी. एस. गिल्ल,** सहव्यवस्थापकीय संचालक **श्री.दिलीप जाधव,** मुख्य प्रशासक (नवीन शहरे) **श्री.मनोहर भगत** प्रामुख्याने उपस्थित होते. आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले की, 'शिक्षणाच्या सार्वत्रीकरणामुळे सामाजिक प्रगती दृत्‌गतीने होत असल्यानेच विकासाची प्रक्रिया घडून येत आहे. आपण समाजाचे काही देणे लागत आहोत, याची प्रत्येकाने जाणीव ठेवल्यास खऱ्या अर्थाने देशात सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित होऊन प्रत्येक व्यक्तीला स्वाभिमानाने जगता येईल. कोणालाही रस्त्यावर उतरण्याची गरज उरणार नाही व समाजात विषमतेची दरी वाढणार नाही.'

या प्रसंगी सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक **श्री. जी. एस. गिल्ल** यांनी, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे मानवतेला दिशा देणारे महामानव होते. डॉ.बाबासाहेबांचे क्रांतीकार्य जनतेला अवगत असून, त्यांच्या सामाजिक योगदानामुळेच मानवजातीचे कल्याण झाले आहे. सर्वात मोठी लोकशाही असलेल्या आपल्या भारताच्या संविधानात विभिन्नतेतून एकता गुंफण्याचा निर्धार त्यांनी पूर्ण केला असून, त्यांच्या मौलिक विचारांचा अंमल प्रत्येकाने आपल्या कृतीत उतरवण्याची गरज आहे' असे विचार त्यांनी आपल्या मनोगतातून मांडले. यावेळी सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक **श्री.दिलीप जाधव** व मध्य रेल्वेचे **श्री.एच.बी. अरुण कुमार** यांची भाषणे झाली. सिडकोचे जनसंपर्क अधिकारी **डॉ. मोहन निनावे** आणि व्यवस्थापक (पणन–२) **डॉ. डी. एल. एन. मूर्ती** यांना पीएच.डी. मिळाल्याबदद्ल त्यांचा समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास कामगार नेते **श्री.मनोज संसारे,** सहआयुक्त **श्री.दीपक देशमुख,** कार्यकारी अभियंता **श्री.ज.रं.म्हेत्रे,** साहाय्यक अभियंता **श्रीमती एच.डब्लू. कांबळे,** सिडको कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष **श्री.निलेश तांडेल** हेही उपस्थित होते. तसेच कोकण भवन आणि सिड्को भवन येथील अधिकारी व कर्मचारी यांची मोठी उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे सचिव **श्री.मिलिंद बागुल** यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन **श्री. अनिल भातणकर** आणि **श्री.संजय गायकवाड** यांनी केले. तर आभारप्रदर्शन **श्री.सिध्दार्थ नगराळे** यांनी केले. सदर कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

---

कृपया वरील वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून / माध्यमातून ठळक प्रसिद्धी द्यावी, ही विनंती

कळावे

**(डॉ. मोहन निनावे)**
जनसंपर्क अधिकारी, सिडको

प्रति ______________________

______________________